International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# 'कोसबाडच्या टेकडीवरून' मधील स्त्रीवादी दृष्टीकोन

**डॉ. लता पांडुरंग मोरे**
मराठी विभाग प्रमुख, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी
*Corresponding Author*- **डॉ. लता पांडुरंग मोरे**
ईमेल :- latapmore18@gmail.com

***प्रास्ताविक :-***
*स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे हा वाङ.मयविश्वातील महत्त्वाचा दस्तऐवज आहे. या आत्मचरित्रानी मराठी साहित्यात महत्त्वाचे दालन निर्माण केले आहे. रमाबाई रानडे - आमच्या आयुष्यातील काही आठवणी (१९१०) ,लक्ष्मीबाई टिळक - (१९३४ ते १९३७), गोदावरी परुळेकर - जेव्हा माणूस जागा होतो (१९७२), आनंदीबाई शिर्के - सांजवात (१९७२) अनुताई वाघ - कोसबाडच्या टेकडीवरून (१९८४) शांताबाई कांबळे - माझ्या जन्माची चित्तरकथा (१९८६) सिंधुताई सपकाळ - मी वनवासी (१९९०), अनुसया लिमये - आम्ही बी घडलो (१९९२ ) कमल भागवत - न संपलेली वाट (१९९६), नसीमा हुरजूक - चाकाची खुर्ची (२००१), उर्मिला पवार - आयदान (२००३) अशा अनेक लेखिकांनी आपले अनुभवविश्व आत्मचरित्रातून समृद्धपणे साकारले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अनुताई वाघ यांच्या 'कोसबाडच्या टेकडीवरून' या आत्मचरित्राचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. या अभ्यासासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.*

---

**समाजशास्त्रीय संशोधन पद्धती :-**

एकोणिसाव्या शतकात समाजशास्त्र या समाजाचे वैज्ञानिक अभ्यास अध्यापन करणाऱ्या ज्ञानशाखेचा उदय झाला. तेंव्हापासून आजपर्यंत या आधुनिक शास्त्राची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. आधुनिक काळातील मानवी संबंधातील वाढती गुंतागुंत आणि क्लिष्टता या विषयी वस्तुनिष्ठ स्वरूपाची सैद्धांतिक मांडणी करण्यासाठी समाजशास्त्राला इतर शास्त्रांची आणि इतर शास्त्रांना समाजशास्त्राची गरज भासू लागली. समाजातील मानवी संबंध, संरचना, कार्यात्मक व्यवस्था, आंतरक्रिया, संघटन, विघटन, नियोजन, चळवळी, परिवर्तन, इत्यादीचा वैज्ञानिक अभ्यास करणारी ही ज्ञानशाखा आहे.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यिक ज्या समाजामध्ये जन्मतो त्या समाजाचे संस्कार त्याच्यावर होतात. साहित्यिक आणि समाज यांचा संबंध अत्यंत जवळचा असतो. या विचारातून समाजशास्त्रीय समीक्षा निर्माण झाली. फ्रेंच समीक्षक , इतिहासकार, तत्वज्ञ इपॉलीस आदाल्फ तेन यांनी साहित्यकृतींची चिकित्सा करण्यासाठी वंश, परिस्थिती आणि क्षण हे तीन घटक अभ्यासले पाहिजेत असा सिद्धांत मांडला. या सिद्धांतातील वंश म्हणजे लेखकाचे जन्मजात अनुवंशिक गुण होत; लेखकाची राजकीय, सामाजिक व भौगोलिक पार्श्वभूमी म्हणजे परिस्थिती होय आणि ज्या ऐतिहासिक परिस्थितीत तो लेखन करत असतो ते म्हणजे क्षण आहेत असे तेन म्हणतात.

समाजशास्त्रीय संशोधन ही एक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये तार्किकदृष्ट्या सुसंगत पद्धतशीर आणि संघटनात्मक प्रक्रियांचा समावेश होतो. समाजशास्त्रीय अभ्यासात मुख्य तीन टप्पे असतात १.कार्यक्रम आणि संशोधन पद्धतीचा विकास २. प्रायोगिक अभ्यास आयोजित करणे ३. डेटा प्रक्रिया आणि विश्लेषण, निष्कर्ष काढून अहवाल करणे.

समाजशास्त्रीय संशोधन हा एक दस्तऐवज असतो. तो एका विशिष्ट क्रमाने संशोधन क्रिया आयोजित करतो आणि निर्देशित करतो तसेच त्यांच्या अंमलबजावणीच्या मार्गाची रूपरेषा देतो. समाजशास्त्रीय संशोधन ही तार्किकदृष्ट्या सुसंगत पद्धतशीर आणि संस्थात्मक तांत्रिक प्रक्रियेची प्रणाली आहे. ही अभ्यासपद्धती अभ्यासाधीन सामाजिक घटनेबद्दल अचूक वस्तुनिष्ठ डेटा प्राप्त करते. समाजशास्त्रीय संशोधनाचे बुद्धीमत्ता (पायलट), वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक असे तीन प्रमुख प्रकार आहेत.

**स्त्रीवाद आणि स्त्रीवादी विचार प्रणाली :-**

स्त्रीवाद ही १९६० नंतरच्या काळातील एक विचार प्रणाली असून मानवमुक्तीच्या चळवळीतील तो एक प्रवाह आहे. स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करणारी ही विचार प्रणाली आहे. पितृसत्ता आणि लिंग वाद यांच्याशी पुकारलेल्या लढ्यातून या विचारसरणीचा उगम झाला.१९७५ नंतर या प्रवाहाने ठसठशीत रूप धारण केले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रीला स्वतंत्र स्थान मिळाले पाहिजे म्हणून स्त्रीवादी विचारवंतांनी लढा दिला.

प्रस्थापित समाजामध्ये पुरुषी आक्रमकतेतून स्त्रियांच्या शोषणाच्या प्रवृत्ती निर्माण झाल्या. अशा प्रवृत्तींना रोखण्याचे काम स्त्रीवादी विचार प्रणाली करते. ही विचारप्रणाली स्त्री म्हणजे अबला म्हणून तिने सर्व काही सहन करावे, लाजावे, गोड बोलावे, चूल -मुल यात समाधान मानावे हे नाकारते. ही विचारप्रणाली स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरते. तसेच या संदर्भातील पारंपरिक रूढ संकेत नाकारते. स्त्रीवाद ही एक जिवंत सामाजिक प्रक्रिया असून ती स्त्रीचा माणूस म्हणून विचार करते. ही विचारप्रणाली स्त्रियांचा विकास साधते, स्वत्व संपादनासाठी प्रवृत्त करते. परंतु पुरुषांपासून फारकत घेऊन स्वतःचा सवतासुभा निर्माण करण्याला नकार देते. याविषयी विद्युत भागवत म्हणतात, "स्त्रीवाद ही समाज परिवर्तन घडवू पाहणारी राजकीय जाणीव आहे.... स्त्रीवादी जाणीव विज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्राशी संलग्न विचार व कृती करण्याचा प्रयत्न करते." ( मराठी वाङमय कोश - खंड ४, संपा. विजया राजाध्यक्ष, पृष्ठ क्र. ४११)

स्त्रीवादी साहित्य समीक्षा ही साहित्यातील स्त्रीवादी जाणिवांचा शोध घेते. ही पद्धती धर्म, संस्कृती, समाजकारण, राजकारणापासून साहित्यापर्यंत प्रत्येक ठिकाणी स्त्रियांवर झालेल्या अन्याय अत्याचाराची मीमांसा करते. स्त्रीवादी समीक्षेचे ध्येय स्पष्ट करताना डॉ. वंदना महाजन म्हणतात, "साहित्य, भाषा आणि समीक्षा यातील पुरुषी वर्चस्ववादाचा दुय्यम दृष्टिकोन स्पष्ट करणे आणि समतामय साहित्य प्रणालीच्या दिशेने वाटचाल करणे हे स्त्रीवादी समीक्षेचे ध्येय आहे. ( स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, पृष्ठ क्र. ३५)

**'कोसबाडच्या टेकडीवरून' मधील स्त्रीवादी दृष्टीकोन :-**

अनुताई वाघ यांचा जन्म पुणे येथे १७ मार्च १९१० रोजी झाला. त्यांचे वडील बाळकृष्ण वाघ सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीस होते. अनुताईंच्या वडिलांनी आपल्या मुलींना मुलांसमान मानले. त्यांना शिक्षण देऊन स्वावलंबी केले. अनुताईंच्या काळात बालविवाहाची पद्धत होती.याप्रमाणे त्यांचा विवाह वयाच्या १३ व्या वर्षी शंकर वामन जातेगावकर यांच्याशी झाला. पण दुर्दैवाने विवाहानंतर सहा महिन्यातच शंकर जातेगावकर यांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला. अनुताई वयाने लहान असल्यामुळे लग्नानंतर त्या सासरी गेल्या नव्हत्या. तसेच त्यांना सासरचे किंवा पतीचे दर्शनही झाले नव्हते. अनुताई मुळातच बंडखोर आणि धाडसी स्वभावाच्या होत्या. म्हणूनच वैधव्यानंतर कोलमडून गेल्या नाहीत. मूळात त्यांचें वयही तेवढे नव्हते. पण आयुष्यात पुनर्विवाह न करता त्यांनी शिक्षण घेतले आणि शिक्षक म्हणून आदिवासी भागात कार्य केले.

अनूताई यांना अकाली वैधव्य आले म्हणून त्या आदिवासींच्या विकासाकडे वळल्या असे म्हणता येत नाही. कारण आदिवासींच्या जीवनातील प्रश्न सोडवावेत, त्यांच्या जीवनाची उन्नती करावी, त्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करून द्यावी या आंतरिक उर्मीने त्या या कार्याकडे वळल्या आहेत. आदिवासींच्या उन्नतीसाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या अनुताईंच्या

विचारांमधून स्त्रीवादी विचारांचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास तसे अनेक घटना प्रसंग या आत्मचरित्रात स्पष्टपणे दिसतात.

या आत्मचरित्रातील अनुताईंची बहिण लीला बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेतलेली आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात ती स्वतःला झोकून देते. शांततावादी सत्याग्रहात सहभागी होते.तसेच यामुळे प्राप्त झालेला तुरुंगवास आनंदाने स्वीकारते. पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य युद्धात सहभागी होणारी लीला निश्चितच स्त्रीवादी विचारांची आहे. अनुताईं यांच्यावर स्वावलंबनाचे, धाडसी वृत्तीचे संस्कार दुर्गाबाई नेने म्हणजेच माई यांनी केले. अनुताईवर लहान वयात वैधव्याची कुराड कोसळली म्हणून सांत्वनासाठी दुर्गाबाई अनुताईंच्या घरी आल्या. त्यांनी अनुताईंच्या आई - वडिलांची समजूत घातली आणि "जावयाच्या दुःखाने रडत बसू नका! मुलीला शिकवा " (कोसबाडच्या टेकडीवरुन, पृष्ठ ४५) असा मौलिक उपदेश केला. दुर्गाबाई हा उपदेश करून थांबल्या नाहीत तर त्यांनी अनुताईंना आपल्यासोबत अकोल्याला घेवून आल्या, तेथे त्यांच्या शिक्षणाची सोय केली.

त्यांनी अनूताईंना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांच्यातील सुप्तगुणांना हेरून त्या गुणांची जोपासना केली. त्यामुळे अनुताईचे जीवन बदलले. तत्कालीन रुढीग्रस्त समाजात विधवेला मिळणाऱ्या दुःखापासून अनुताईंना मुक्त केले. स्त्री शिकली तरच आपल्यावरील अन्यायाच्या विरुद्ध ठामपणे उभी राहील असे त्यांना वाटत होते म्हणूनच स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या दुर्गाबाई स्त्रीवादी विचारांच्या आहेत. अनुताईंच्या शिक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमातून त्यांचे स्त्रीवादी व्यक्तिमत्व स्पष्टपणे दिसते.

दुर्गाबाई यांच्यातील स्त्रीवादी विचार आणखी एका प्रसंगातून स्पष्ट पणे दिसतो. अकोला येथे राष्ट्रीय शाळेतर्फे लोकमान्य टिळक यांच्या जयंती निमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत मुलींना भाग घेण्याची परवानगी नव्हती. दुर्गाबाईंच्या बंडखोर स्वभावामुळे अनुताईंना स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी मिळाली पण स्पर्धक म्हणून बक्षिसासाठी विचार केला जाणार नसल्याची सूचना संयोजकांनी दिली. पण विशेष म्हणजे या स्पर्धेत सर्वात चांगले वक्तृत्व अनुताई यांचे झाले. त्यामुळे परीक्षकांनी अनुताई यांचे कौतुक करताना म्हटले, " स्पर्धेत मुलींना भाग घेता येत नाही या तांत्रिक अडचणीमुळे हिला बक्षीस देता येत नाही. पण नंबर कोणाचा आहे ते सांगायला नकोच." (कोसबाडच्या टेकडीवरुन, पृष्ठ . ४६) परीक्षकांच्या या उद्गारातून त्या काळात गुणवत्ता असूनही समाजाकडून स्त्रियांवर अन्याय होत असत हे लक्षात येते. याबरोबरच या प्रसंगांमधून आणखी एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे स्त्रीवादी विचार प्रणाली सुरू होण्याच्या कितीतरी अगोदर स्त्रियांच्या हक्कासाठी दुर्गाबाई लढत होत्या. मुलींना वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी नसताना त्या ठामपणे या विचारा विरोधात उभ्या राहून मुलींना स्पर्धेत सहभागी करून घेण्यास भाग पाडले आणि त्यांच्यातील गुणवत्ता सिद्ध करून दाखविली. त्यामुळे याही प्रसंगातून दुर्गाबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील स्त्रीवादी विचार स्पष्ट दिसतो.

अनुताई यांचे वडील आधुनिक विचारांचे होते त्यांनी आपल्या मुलींना मुलांसमान मानले. त्यांना शिक्षण देवून स्वावलंबी केले. अनुताई यांच्यावर त्यांच्या वडिलांप्रमाणेच दुर्गाबाई नेने यांचे संस्कार झाले होते. या दोघांच्या संस्कारामुळे अनुताई धाडसी स्वभावाच्या बनल्या. वयाच्या १९व्या वर्षापासून त्यांनी नाशिक विभागातील चांदवड या खेड्यात प्राथमिक शिक्षिका आणि मुख्याध्यापिका म्हणून नोकरीस सुरुवात केली. नोकरी करत असतानाच रात्र शाळेच्या माध्यमातून त्यांनी मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाची आवड असणाऱ्या अनुताईंनी वयाच्या ५१ व्या वर्षी दोन्ही डोळयांमध्ये मोतीबिंदू झालेला असताना बी.ए.ची पदवी प्रथम श्रेणीमध्ये प्राप्त केली आणि समाजापुढे शिक्षणाचा एक नवा आदर्श घालून दिला.

अनुताईंचे विचार त्यांच्या काळाचा विचार केल्यास खूपच आधुनिक होते. त्या १९ वर्षाच्या तरुण विधवा असूनही त्यांची अनेक मित्रांशी निखळ मैत्री होती. विशेष म्हणजे या मैत्रीविषयी समाजाने कधी आक्षेप घेतला नाही. स्त्री-पुरुष मैत्रीविषयी त्या

म्हणतात, "बायका - पुरुष मोकळेपणी हिंडू फिरू लागले व काम करू लागले तर परस्पर संबंध निर्दोष राहण्यास मदत होईल."( कोसबाडच्या टेकडीवरुन, पृष्ठ ६१) स्त्री-पुरुष हा भेद मनात न घेता कार्य केले पाहिजे असा उपदेश त्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनाही करतात. आपले मन शुद्ध आणि निर्भय असले पाहिजे म्हणजे कोणताही धोका उद्भवत नाही असे त्या प्रशिक्षणार्थींना सांगतात. स्त्री-पुरुष हा भेदभाव न मानणाऱ्या अनुताई येथे स्पष्टपणे स्त्रीवादी विचारांच्या दिसतात.

अनुताईंनी समाजातील स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांच्या लक्षात आणून द्यायचे होते. तसेच त्यांच्यात सुधारणावादी विचार रुजवायचे होते. त्यामुळे त्यांनी आपल्या महिला भगिनींच्या सहकार्याने **शनिवार महिला मंडळ** स्थापन केले आणि या मंडळात त्या मुद्दाम स्त्री मासिकातील स्त्रियांसंबंधीचे लेख, विचार वाचून दाखवत. येथेही अनुताईंच्या व्यक्तिमत्त्वातील स्त्रीवादी विचारप्रणाली स्पष्ट होते. विनोबा भावे यांच्या आदेशानुसार भारतभर स्त्री शक्ती जागरणासाठी पदयात्रेचा कार्यक्रम सुरू झाला.

त्यावेळी अनुताईनी आदिवासीच्या शिक्षणाबरोबरच डहाणू तालुक्यातील स्त्रीशक्ती जागरणासाठी पदयात्रेचा कार्यक्रम सुरू केला. यावेळी त्यांनी बालसेविकांना सोबत घेऊन रंजनपर कार्यक्रमांच्या माध्यमातून स्त्रियांचे प्रश्न समाजासमोर मांडले. याबरोबरच बालसेविका प्रशिक्षणाच्या माध्यमातून हजारो बालसेविकांना प्रशिक्षित केले. यातील अनेक बालसेविका पुढील ग्रामसेविका, मुख्यसेविका तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षिका बनल्या. अनुताईंनी डहाणू येथे **स्त्रीशक्ती जागृती समिती जिल्हा ठाणे** ही संस्था सुरू केली आणि या संस्थेद्वारे स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. या सर्व कार्यातून अनुताईंचा स्त्रीवादी दृष्टिकोन स्पष्ट दिसतो.

आदिवासी भागात मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न इतर भागापेक्षा जास्त बिकट असतो. आदिवासी मुलींना शाळेत घेऊन जाणाऱ्या अनुताईंना "मुलींना शिकवून काय करायचे" ( कोसबाडच्या टेकडीवरुन, पृष्ठ ११७) असा प्रश्न आदिवासी पालक विचारत. अशा लोकांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून शाळेत आणणे हे काम फारच अवघड होते. पण अनुताईंनी अत्यंत जिद्दीने आणि चिकाटीने पालकांचे मन:परिवर्तन करून आदिवासी मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली अनुताईंचे स्त्री शिक्षणाचे हे कार्य स्त्रीवादी विचार प्रणालीतील आहे.

**निष्कर्ष :-**

१) अनुताईंच्या विचारात स्त्री-पुरुष मैत्र भाव दिसतो

२) सामुदायिक सहजीवनाची गरज म्हणून स्त्री पुरुष समानतेचा विचार रुजविला

३) त्यांच्या सामाजिक कार्यातून स्त्रियांच्या मानसिक व वैचारिक प्रबोधनाचा प्रयत्न दिसतो

४) आणि त्यांची भूमिका आदिवासी स्त्रियांच्या पुनर्स्थनासाठी प्रयत्न करणारी दिसते

५) अनुताईंनी पारंपरिक जीवन जगण्यापेक्षा समग्रलक्षी दृष्टिकोन ठेवून स्वतःची वेगळी ओळख अनुताई निर्माण केले

६) पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुष चे अफाट कार्य करू शकणार नाही ते कार्य अनुताईंनी केले

**संदर्भ** :-


१. धोंगडे अश्विनी डॉक्टर स्त्रीवादी समीक्षा स्वरूप व उपयोजन दिलीप राज प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती1993

२. पाटील शोभा स्त्रियांची आत्मचरित्र स्त्रीवादी शोध मल्हार प्रकाशन पुणे 2002

३. भालेराव विमल डॉक्टर आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्र एक अभ्यास साहित्य प्रसार केंद्र नागपूर प्रथम आवृत्ती1986

४. महाजन वंदना डॉक्टर स्त्रीवाद आणि मराठी साहित्य विजय प्रकाशन नागपूर द्वितीय आवृत्ती 2015

५. राजाध्यक्ष विजया मराठी वाङ्मय कोश खंड चार महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई 2002

६. वाघ अनुताई कोसबाडच्या टेकडीवरून ऋचा प्रकाशन ठाणे तृतीय आवृत्ती 1992

७. वडगाव श्रुती स्त्रियांची आत्मचरित्र दिलीप राज प्रकाशन पुणे 2005

अनुताईंनी ताराबाई मोडक यांच्यासोबत त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी भागात बालशिक्षणाचे कार्य केले

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुराज्य निर्माण करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन हुजूरपागेतील शिक्षिकेची नोकरी सोडली आणि ताराबाई मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली बोर्डी कोसबाड येथे शिक्षण कार्य सुरू केले